**PRESS MONITOR**

Publication : Lokmanthan
Edition : Nashik
Date : March 07, 2018

# मूनबोने लाँच केला अल्फीअस यूव्ही + यूएफ वॉटर प्युरिफायर

नवी दिल्ली: मूनबोने भारतातील सर्वांत शक्तीशाली यूव्ही वॉटर प्युरिफायर्समधील अल्फीअस यूव्ही+यूएफ हा वॉटर प्युरिफायर लाँच करून आपल्या उत्पादन श्रेणीचा विस्तार केला आहे. ,/- रुपये किमतीच्या या वॉटर प्युरिफायरला टीयूव्ही या जगविख्यात जर्मन प्रमाणीकरण प्रयोगशाळेचे प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. ॲल्युमिनिअमपासून तयार करण्यात आलेला सामान्य वॉटर प्युरिफायर एक लिटर पाण्यातून एक कोटी सुक्ष्मजीव वेगळे काढू शकतो, तर अल्फीअसमध्ये एक लिटर पाण्यातून कोटी सुक्ष्मजीव वेगळे काढण्याची क्षमता आहे. पाण्यामध्ये विरघळलेल्या एकूण



घनपदार्थांची पातळी (टीडीएस पातळी) कमी असलेल्या भौगोलिक प्रदेशांसाठी अल्फीअस यूव्ही + यूएफ विशेषत्वाने तयार करण्यात आला आहे. कारण, अशा भागांत आरओ शुद्धीकरणामुळे पेयजलातील अत्यावश्यक क्षार नष्ट होतात आणि ते पाणी अनारोग्यकारक होते.

एचएसआयएल लिमिटेडचे अध्यक्ष आणि ग्राहकोपयोगी उत्पादन विभागाचे प्रमुख श्री. राकेश कौल म्हणाले, औद्योगिकीकरण आणि शहरीकरण यांचा परिणाम म्हणून जलप्रदूषणाच्या पातळीत जलद गतीने वाढ झाली आहे आणि त्यामुळे पाण्याद्वारे होणाऱ्या आजारांचे प्रमाणही वाढले आहे. अशा परिस्थितीत वॉटर प्युरिफायर ही मूलभूत गरज झाली आहे. याचा परिणाम म्हणून भारतातील वॉटर प्युरिफायर्सची बाजारपेठ आज कोटी रुपयांची आहे आणि त्यात टक्क्यांनी वाढ होणे अपेक्षित आहे.